# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
# कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

२० एप्रिल, २०१९


☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


## दुर्गापुर पोलीसांनी केल्या दोन घरफोडया उघड मुद्देमालासह आरोपी अटकेत.

पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे दिनांक १७/११/१८ रोजी फिर्यादी नामे डॉ. अमित रामचंद्र कोसुरकर वय ३४ वर्ष जात तेली धंदा डॉक्टरी वैद्यनगर तुकुम चंद्रपुर यांचे मेजरगेट जवळ असलेल्या दवाखाण्यात दि. १७/११/१८ चे रात्री त्यांच्या दवाखाण्याचे कुलुप तोडुन चोरटयांनी ड्रावर मध्ये असलेले ८,००० रू. चोरीस नेलेले होते. पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे सदर घटनेची माहिती मिळताच गुन्हा नोंद करण्यात आला.

तपासादरम्यान २३/०१/२०१९ रोजी गुन्हयामध्ये सहभागी असलेल्या एका अल्पवयीन आरोपीस समतानगर वार्ड क्रं. ६ येथून ताब्यात घेण्यात आले होते व त्याच्या कडून चोरीस गेलेले ८,००० रू पैकी नगदी ३,००० रू हस्तगत करण्यात दुर्गापुर पोलीसांना यश आले होते परंतु सदर गुन्हयामध्ये अल्पवयीन आरोपी सोबत आणखी एका आरोपीचा सहभाग होता व तो अदयाप पावेतो फरार होता. त्याच्या मागावर दुर्गापुर पोलीस असताना दुर्गापुर पोलीसांना गोपनिय माहिती मिळाली की फरार असलेला आरोपी हा नागपुर येथे दिसुन आला आहे. त्यानुसार दुर्गापुर पोलीसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर नागपुर येथील बर्डी चौकात सापळा रचुन फरार आरोपीस आज दि. १९/०४/२०१९ रोजी अटक केले.

अटक करण्यात आलेला अरोपी राहुल शत्रुघन रायपुरे याची कसुन चौकशी केली असता त्याने दुर्गापुर सोबतच रामनगर येथे दाखल असलेल्या अपराध क्रमांक ०९/२०१९ व अपराध क्रंमाक १४४४/२०१९ अशा चोरीचे दोन गुन्हे त्यानेच केले असल्याची सुध्दा कबुली दिली तसेच त्या गुन्हयामध्ये चोरीस गेलेला मुद्देमाल १) एक अर्धा ग्रॅमची सोन्याची जिवती किं. २०००, (२) दोन चांदीचे वारे किं. १,००० रू. तसेच (३) चार लहान मुलांचे सोन्याचे अंगठी किं. १५,०००रू. पोलीसांच्या स्वाधिन केला.

सदरची कार्यवाही ही पोलीस स्टेशन दुर्गापुर येथील प्रभारी अधिकारी पोनी. दिपक खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनात पोउनी झामरे यांचे पथक पोहवा अशोक मंजुळकर, रजनीकांत पुठावार, सुनिल गौरकार, नापोका सुनिल मेश्राम, उमेश वाघमारे यांनी पार पाडली.

२० एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
📠: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# प्रेस नोट

पर्ल्स (P.A.C.L.) कंपनीने गुंतवणुकदारांची फसवणुक केल्या प्रकरणी गुंतवणुकदारांनी गुंतविलेल्या त्यांच्या रक्कमा परत करण्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार माजी सरन्यायाधिश श्री. आर.एम.लोढा यांच्या अध्यक्षतेखाली समित गठीत करण्यात आलेली आहे. सदर समिती मार्फत गुंतवणुकदारांच्या रक्कमा परत करण्याची कार्यवाही सुरू असुन या करीता गुंतवणुकदारांना सेबीच्या **http// sebipaclrefend.co.in** या संकेतस्थळावर दिंनाक ३०/०४/२०१९ पर्यंत रक्कम मिळण्यासंदर्भात ऑनलाईन फार्म भरून दावा दाखल करण्यासाठी समिती व्दारे गुंतवणुकदारांना आवाहन करण्यात आले आहे.

**P.A.C.L.** कंपनीच्या गुंतवणुकदारांना उपरोक्त संकेतस्थळाचा वापर करून ऑनलाईन फार्म भरण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्फतीने ई– सेवा केन्द्रा मार्फत सुविधा उपलब्ध करून **P.A.C.L.** कंपनीच्या गुंतवणुकदारांनी दिंनाक ३०/०४/२०१९ पर्यंत त्यांनी गुंतविलेल्या रक्कमेचा दावा करण्याकामी ई–सेवा केन्द्रा मार्फत ऑनलाईन फार्म भरून देणेबाबत शासनाचे आदेश झालेले आहे.

---